# कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचना

## लॉकडाउनच्या कालावधीत सुट दिलेली शेतीविषयक आणि शेतीसंलग्न कामे

१. पशुवैद्यकीय रुग्णालये

२. कृषी उत्पादनांच्या खरेदीशी संबंधीत संस्था

३. राज्य शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समितीद्वारे संचालित ‘मंडी’

४. शेतकरी व शेतमजुरांमार्फत करण्यात येणारी शेतीची कामे

५. शेतीच्या कामाशी संबंधित कस्टम हायरिंग सेंटर (सीएचसी)

६. खते, कीटकनाशके व बियाण्याचे उत्पादन व पॅकेजिंग युनिट

७. जिल्ह्यांतर्गत व जिल्ह्याबाहेर शेती निगडित मशीनची ने-आण

उदा. हार्वेस्टर, कापणी व पेरणी संबंधित मशीन

या सवलतींमुळे शेती व शेतीशी संबंधित कामे सुलभ होतील जेणेकरून आवश्यक वस्तूंचा पुरवठा होईल आणि लॉकडाऊन दरम्यान शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही. लॉकडाऊन दरम्यान अंमलबजावणीसाठी संबंधित मंत्रालये/ राज्य शासन विभाग आणि केंद्रशासित प्रदेशांना आवश्यक दिशा निर्देश जारी केले आहेत.

*(गृह मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, भारत सरकार पत्र नं. -४०/०३/२०२०-डीएम-आय (ए) दि. २४, २५ आणि २७ मार्च २०२० परिच्छेद क्र. २,४,५,६ अपवाद वगळता, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार)*

**भारत सरकारच्या धोरणात्मक निर्देशांच्या आधारे, राज्य सरकारच्या विविध मंत्रालये /विभागांनी कृषी आणि संबंधित क्षेत्राशी संबंधित उपक्रम सुरू ठेवण्यासाठी, सुलभतेसाठी अंमलबजावणी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.**

**शेतकऱ्यांसाठी सल्ला**

अ. **पिकांची काढणी व मळणी** :

- कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर, सद्य परिस्थितिमधे रब्बी पिके पक्वता कालावधीमधे आहेत. सर्व शेतीची कामे वेळेवर झाली आहेत त्यामुळे काढणी व हाताळणी तसेच बाजारपेठेत माल पाठवणे अपरिहार्य आहे. तथापि, सदरील रोगाचा प्रसार रोखण्यासाठी खबरदारी आणि सुरक्षा उपायांचे पालन केले पाहिजे. साध्या उपायांमध्ये सामाजिक अंतर ठेवणे, साबणाने हात धुवून वैयक्तिक स्वच्छता राखणे, मास्क परिधान करणे, संरक्षक कपडे आणि उपकरणे व यंत्रसामग्री साफ करणे समाविष्ट आहे. शेतीच्या संपूर्ण कामात प्रत्येक ठिकाणी सुरक्षा उपाय आणि सामाजिक अंतरांचे अनुकरण करावे.
- विविध राज्यांमध्ये गहू कापणीचे काम चालु आहे त्यामुळे हार्वेस्टरला जिल्ह्याअन्तर्गत व जिल्ह्याबाहेर जाण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. दुरुस्ती, देखभाल आणि कापणीच्या कामात गुंतलेल्या कामगारांची खबरदारी व सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

- रब्बी हंगामातील मोहरी हे दुसरे महत्त्वाचे पीक आहे. या पिकाची काढणी अंतिम टप्प्यात असून जिथे जिथे आधीच कापणी झाली आहे तेथे मळणी केली जात आहे. मसूर, मका आणि मिरचीची काढणी सुरू असून हरभरा पिकाची काढणी जवळ येत आहे.
- ऊस तोडणी चालु असून उत्तर भागात लागवडीची वेळ जवळ आली आहे
- शेतातील कामापुर्वी आणि कामे झल्यानंतर पिके, फळे, भाज्या तसेच अंडी आणि मासे या कामात गुंतलेल्या सर्व शेतकरी तसेच कामगार या सर्वानी वैयक्तिक स्वच्छता आणि सामाजिक अंतर ठेवण्याचे उपाय करणे आवश्यक आहे.
- शेतमाल कापणी किंवा तोडणीचे काम करत असतांना एका कामगाराला ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल.
- शेतकऱ्यांनी आराम करण्याच्या वेळेस, जेवण करताना तसेच मालाची ने-आण करताना शेतमाल गाडीत भरताना व उतरवताना किमान एकमेकांपासून तीन ते चार फुटाचे अंतर राखणे आवश्यक आहे.
- शक्यतो एकाच ठिकाणी गर्दी न करता शेतीमधील वेगवेगळी कामे कमीत कमी मजुरांमार्फत करणे आवश्यक आहे, त्यासाठी शक्यतो घरातील माणसांच्या मार्फतच शेतीकामे करावीत ज्यामुळे बाहेरील विषाणूचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल.
- शेतीकामे शक्यतो मशिनच्या साहयाने करावीत, त्यामध्ये कमीत कमी मनुष्यबळाचा वापर करावा तसेच शेती कामासाठी वापरली जाणारी अवजारे, गोणी तसेच पॅकिंगच्या गोष्टी ह्या सुद्धा निर्जंतुकीकरण कराव्यात
- शेतमालाचे ढीग करण्यासाठी दोन ढिगामधील अंतर तीन ते चार फूट ठेवणे आवश्यक आहे त्यासाठी शक्यतो एक किंवा दोन कामगारच वापरावेत. मका आणि भुईमूग या पिकांच्या मळणीसाठी वापरले जाणाऱ्या यंत्रांचे निर्जंतुकीकरण करावे कारण ही यंत्रे शेतकरी वेगवेगळ्या गटांमध्ये वापरत असतात.

**ब. शेतमालाचे काढणीपश्चात साठवणूक व विपणन व्यवस्थाच्या दरम्यान करावयाच्या उपाययोजना**

- शेतकऱ्यांनी मालाची वाळवणी, मळणी, धान्य साफ करणे, प्रतवारी करणे इत्यादी कामे ही शेतावरच करणे आवश्यक असते. यासाठी शेतकऱ्यांनी तोंडावर मास्क वापरावा जेणेकरून धूळ तोंडावाटे आत जाणार नाही.
- अन्नधान्ये, कडधान्ये हे काढणीनंतर योग्य वेळेस सुकवावे. साठवणूक करताना किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी अगोदर वापरलेल्या गोण्या वापरू नयेत यासाठी साठवणूकीच्या गोण्यांचे पाच टक्के निंबोळी अर्कात भिजू घालून निर्जंतुकीकरण करावे. शेतमालाची चांगली किंमत येण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे यांचा वापर करावा.
- शेतकऱ्यांनी शेतमाल गाडीमध्ये भरताना तसेच उतरावतांना, बाजारपेठेमध्ये नेतांना व लिलाव करते वेळेस पुरेसे वैयक्तिक सुरक्षिततेचे उपाय करणे आवश्यक आहे.

- बियाणे उत्पादक शेतकऱ्यांना तयार झालेले बियाणे कंपनीकडे पाठवण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. यासाठी विकलेल्या बियाण्याचे पैसे घेते वेळी आवश्यक ती काळजी घेणे महत्त्वाचे आहे. तसेच बियाणे वाहतूक करतांना आवश्यक कागदपत्रे बरोबर बाळगणे बंधनकारक आहे.
- येत्या खरीप हंगामाच्या दृष्टिकोनातून बियाणे उत्पादक कंपन्या पॅकेजिंग विभाग यांना सदरील बियाणे हे एका राज्यातून दुसऱ्या राज्यांमध्ये पाठवण्यासाठी मुभा देण्यात आलेली आहे, जेणेकरून येणारा खरीप हंगाम हा सुरळीत होईल.
- टोमॅटो, कोबी, फ्लॉवर, काकडी, पालेभाज्या व इतर भाजीपाला बाजारपेठेमध्ये पाठवताना शेतकऱ्यांनी वैयक्तिक सुरक्षिततेचे उपाय करणे गरजेचे आहे.

**क. शेतात उभ्या असलेल्या पिकांबाबत करावयाच्या उपाययोजना**

- गहू पिकविणाऱ्या बहुतांश भागांतील तापमान अद्यापही सरासरीपेक्षा कमी असून त्यामुळे गहू कापणीस दहा ते पंधरा दिवस उशीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी कोणतीही नुकसान न होता २० एप्रिल पर्यंत गव्हाची काढणी करू शकतात, तसेच काढणीस उशीर जरी झाला तरी शेतकऱ्यांना विक्री संदर्भात आवश्यक ती उपाय योजना करणे शक्य आहे.
- फळपिकांमध्ये विशेषतः आंब्यामध्ये फळधारणा होत असून यासाठी आवश्यक त्या फवारण्या व पीक संरक्षणाच्या संदर्भात शेतीची कामे करत असताना उपकरणे हाताळतांना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे
- भात पिकानंतर घेतल्या जाणाऱ्या उन्हाळी कडधान्य पिकांमध्ये पांढऱ्या माशीचे नियंत्रण करणे महत्त्वाचे असून यासाठी वैयक्तिक पातळीवर संरक्षित उपाय योजना कराव्यात जेणेकरून विषाणूंचा प्रादुर्भाव रोखता येईल.

---- xxx ----